महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ बस स्थानकांच्या आवारात होर्डिंग लावणेबाबतबाबत

महाराष्ट्र शासन
नियोजन (रोहयो) विभाग
शासन निर्णय क्र. प्रचार २०१२ /प्र.क्र.११६/रोहयो-६ब
१६ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २ डिसेंबर , २०१३

वाचा : १) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो २००८ /प्र.क्र. २४/रोहयो-१, दि. १३ फेब्रुवारी, २००८
२) शासन निर्णय क्र. नरेगा २०१० /प्र.क्र. १४६/रोहयो-६, दि. ८ ऑक्टोबर, २०१०
३) दि. १२ मे, २०१० रोजीच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीचे कार्यवृत्त
४) दिनांक १ जून, २०१२ रोजीच्या महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेच्या दुसऱ्या बैठकीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना दिनांक १ एप्रिल, २००८ पासून महाराष्ट्रात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी योजनेची विविध माध्यमातून प्रसिध्दी करण्यास या विभागाच्या दि. १३/०२/२००८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. परंतु, विविध माध्यमांद्वारे प्रचार व प्रसिध्दी करुनही योजनेची योग्य त्या प्रमाणात प्रसिध्दी न झाल्याने कृती कार्यक्रम राबवून नावीन्यपूर्ण जागृती करण्याचा उपक्रम/योजना राबविण्याचा निर्णय दि. ८ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये काही सुधारणा सुचविण्यासाठी राज्य शासनाने मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली होती. सदर समितीने राज्य मंत्रिमंडळास केलेल्या शिफारशीनुसार राज्य मंत्रिमंडळाने दि. १२ मे, २०१० रोजीच्या बैठकीत उप समितीच्या शिफारशी मान्य केलेल्या आहेत. मंत्रिमंडळाने मान्य केलेल्या शिफारशीनुसार सदर योजनेची प्रचार, प्रसिध्दी व जाणीवजागृती करावयाची आहे. महाराष्ट्रातील बहुतांश अतिदुर्गम भागातील व काही प्रमाणात इतर प्रदेशातील जनतेला अद्यापही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची फारशी माहिती अवगत नाही. त्यामुळे, मंत्रिमंडळाने योजनेचा प्रचार, प्रसिध्दी व जाणीवजागृती करण्याचा निर्णय घेतला आहे.

४. दिनांक १ जून, २०१२ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेची दुसरी बैठक पार पडली. सदर बैठकीत या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता प्रचार व प्रसिध्दीवर भर दयावा, असा निर्णय घेण्यात आला आहे.

उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी प्रचार व प्रसिध्दीसाठी बस स्थानकांच्या आवारात होर्डिंग्जद्वारे प्रसिध्दी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने, पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची ग्रामीण भागामध्ये व्यापक प्रसिध्दी व्हावी याकरिता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ग्रामीण भागातील बस स्थानकांच्या आवारात पाच महिन्यांच्या कालावधीकरीता होर्डिग्जद्वारे प्रसिध्दी करण्यासाठी एस.टी. महामंडळाचे एकमेव परवानाधारक असलेले मे. पूर्णिमा ॲडव्हर्टाजिंग प्रा. लि. यांना दि. १५ डिसेंबर,२०१३ ते दि. १४ मे,२०१४ या ५ महिन्यांच्या कालावधीसाठी ५५ तालुक्याच्या ठिकाणी २० x १० फूट आकाराचे होर्डिग्ज लावण्यासाठी करारबध्द करण्यात येत आहे. तसेच, या प्रयोजनासाठी येणाऱ्या रुपये **५०,७५,०४८**/- (अक्षरी रुपये पन्नास लाख पंच्याहत्तर हजार अठ्ठेचाळीस फक्त) इतक्या खर्चास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक -------------------------------- असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर. विमला)
उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन
2/12/2013

प्रति,

मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (रोहयो) यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
व्यवस्थापक, एस.टी.महामंडळ
मे. पूर्णिमा ॲडव्हर्टाजिंग एजन्सी प्रा. लि.
रोहयो प्रभागातील सर्व उप सचिव/अवर सचिव
निवडनस्ती/रोहयो- ६ब